# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/५५/२००७/२४**
**तक्रार दाखल दिनांक ;- २७/०८/२००७**
**निकाल दिनांक ;- २७/०९/२००७**

**श्री भानुदास बापू मोरे,**
रा. मुर्शदाबादवाडी
ता.फुलंब्री, जिल्हा - औरंगाबाद. अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.

विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६ च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २७/०८/२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २८/०८/२००७ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ११/०९/२००७ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे. अर्जदाराने स्वत;च्या शेतातील ३ एच.पी.च्या वीजपंपाच्या जोडणीसाठी विद्युत वितरण कंपनीकडे अर्ज केला व त्यापोटी त्याला रुपये१४२०/-चे कोटेशन देण्यात आले होते जे त्याने १७/०७/१९९७ रोजी भरले आहे. त्यानंतर अनेक वेळा पाठपुरावा करुन सुध्दा त्याला वीज जोडणी देण्यात आली नाही. दिनांक १८/१२/२००६ रोजी त्यास विद्युत वितरण कंपनीकडून ६१६०/- रुपयाचे वाढीव रकमेचे कोटेशन देण्यात आले. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीत सदरील वाढीव रकमेचे कोटेशन रद्द करण्याबाबत तसेच वीज जोडणी देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे. विद्युत वितरण कंपनीने ज्येष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी दिलेली नसून वीज पुरवठा न मिळाल्यामुळे त्याने रुपये ५०००/- नुकसान भरपाईची मागणी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीत केली आहे.

३) दिनांक ११/०९/२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी श्री जैस्वाल, सहाय्यक अभियंता श्री किन्नुर व श्री पाटिल, कनिष्ठ अभियंता श्री शीरोळे ऊपस्थित होते. सुनावणीच्या वेळी विद्युत वितरण कंपनीच्या नोडल अधिका-याने अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार अर्जदाराने शेतीपंपाच्या जोडणीसाठी दिलेले रुपये १४२०/- चे कोटेशन अर्जदाराने दिनांक १७/०७/१९९७ रोजी भरल्याचे मान्य केले. वीज जोडणीसाठी लागणा-या शेतकरी वीज ग्राहकांना सामानाच्या उपलब्धतेनुसार जोडणी देण्यात येते व त्यानुसार जेष्ठता यादी बनविण्यात आलेली आहे. विद्युत वितरण कंपनीतर्फे

स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर निवेदनात मार्च २००१ पर्यंत ज्या ग्राहकांनी कोटेशन भरले असतील त्यांनी वाढीव कोटेशन त्वरित भरुन वीज जोडणी घ्यावी असे आवाहन केले आहे. अर्जदाराने वाढीव कोटेशन रुपये ६१६०/- चे न भरल्यामुळे वीज जोडणी देण्यात आलेली नाही. दिनांक २८/०८/२००७ रोजी अर्जदारास मिटरची किंमत वगळून रुपये २८५०/- चे सुधारित कोटेशन देण्यात आले व अर्जदाने ही रक्कम भरल्यास वीज जोडणी देण्यात येईल असे त्यांनी आपल्या जबाबात पुढे म्हटले आहे. शेतकरी वीज ग्राहकांना देण्यात येणा-या वीज जोडणीबाबत वीज नियामक आयोग व विद्युत वितरण कंपनीतर्फे निर्देशित असलेली कागदपत्रे, परिपत्रके दाखल करण्याबाबत नोडल अधिका-यांना सांगण्यात आले व पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२००७ रोजी घेण्याचे निश्चीत झाले.

४) दिनांक १८/०९/२००७ रोजी नोडल अधिकारी श्री जैस्वाल,श्री किन्नुर, सहाय्यक अभियंता, व श्री अे. आर. पाटिल सहाय्यक अभियंता हे विद्युत वितरण कंपनीतर्फे तर स्वत; अर्जदार श्री भानुदास बापू मोरे उपस्थित होते.विद्युत वितरण कंपनीतर्फे दिनांक ११/०९/२००७ रोजीच्या सुनावणीत मंचाने मागणी केलेल्या शेतकरी वीज ग्राहकासाठी असलेल्या संबंधीत कोणतेही कागदपत्रे / परिपत्रक मंचात दाखल करण्यात आली नाहीत. विद्युत वितरण कंपनीतर्फे प्रसिध्द केलेल्या जाहीर निवेदनातील इतर शेतकरी वीज ग्राहकांना किती वाढीव रकमेचे कोटेशन देण्यात आलेले आहे या बाबतची माहिती मंचाने विचारली असता ती दिनांक २१/०९/२००७ पर्यंत सादर करण्याचे नोडल अधिका-यांने मान्य केले पण सदरील माहिती २१/०९/२००७ पर्यंत मंचात दाखल करण्यात आलेली नाही.

५) दोन्ही बाजूकडून दाखल झालेल्या कागद पत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणी वरुन असे आढळून येते की, अर्जदाराने शेतीपंपाच्या वीज जोडणी

साठी केलेल्या अर्जापोटी वीज वितरण कंपनीतर्फे देण्यात आलेले रुपये १४२०/- चे कोटेशन त्याने १७/०७/१९९७ रोजी भरले आहे व त्याच दिवशी टेस्ट रिपोर्ट व इतर आवश्यक बाबींची पुर्तता केलेली असल्याचे आढळून येते. वीज जोडणीसाठी लागणा-या सामानाच्या कमतरतेमुळे त्याला १९९७ पासून ते आज पर्यंत वीज जोडणी देण्यात आलेली नाही.विद्युत वितरण कंपनीतर्फे स्थानिक वृत्तपत्रातून दिलेल्या जाहीर निवेदनात मार्च २००१ पर्यंत अर्ज केलेल्या शेतकरी वीज ग्राहकांना वाढीव कोटेशन भरण्याची विनंती करण्यात आली पण या निवेदनात वाढीव कोटेशनच्या रकमेबाबत काहीही नमूद करण्यात आले नाही. दिनांक २८/१२/२००६ रोजी अर्जदारास देण्यात आलेल्या कोटेशनची रक्कम रुपये ६१६०/- अशी होती पण अर्जदाराने २७/०८/२००७ रोजी मंचात दाखल केलेल्या तक्रारी नंतर त्यास वीज वितरण कंपनीतर्फे दिनांक २८/०८/२००७ रोजी रुपये २८५०/- चे सुधारीत कोटेशन देण्यात आले.मंचाने सूनावणी दरम्यान मागणी केलेली इतर शेतकरी वीज ग्राहकांना दिलेले वाढीव कोटेशन तसेच या बाबत विद्युत नियामक आयोग आणि विद्युत वितरण कंपनीतर्फे निर्देशित असलेले कागदपत्रे, परिपत्रके नोडल अधिका-यातर्फे दाखल करण्यात आलेली नाहीत.

६) विद्युत वितरण कंपनीने अर्जदारास दिलेल्या तीन कोटेशनचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | दि.१७/०७/९७ चे कोटेशन (रुपये) | दि.१८/१२/०६ चे कोटेशन (रुपये) | दि.२८/०८/०७ चे कोटेशन (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | सि.आर.ए. सर्व्हिस कनेक्शन चार्जेस | ७५० | १७५० | १७५० |
| २. | अनामत रक्कम | ६०० | १२०० | १००० |
| ३. | कपॅसिटर टेस्टींग | ५० | ५० | ५० |
| ४. | करारनामा | २० | --- | --- |
| ५. | प्रोसेसिंग फि | --- | ५० | ५० |
| ६. | मिटर ची किंमत | --- | ३११० | --- |
| ७. | एकुण | १४२० | ६१६० | २८५० |

७) वरील तिन्ही कोटेशनचे अवलोकन केल्यावर असे आढळून येते की, अर्जदाराने विद्युत वितरण कंपनीने मागणी केल्याप्रमाणे १७/०७/९७ रोजी सर्व्हिस चार्जेस पोटी रुपये ७५०/-, सुरक्षा अनामत रुपये ६००/- कपॅसिटर टेस्टिंग रु. ५०/- व करार पत्र रु. २०/- असे एकुण रुपये १४२०/- भरलेले आहेत. अर्जदाराने टेस्ट रिपोर्ट व इतर बाबींची देखील पूर्तता केलेली आहे. वास्तविक पाहता अर्जदाराने सर्व बाबींची पुर्तता केल्या नंतर विद्युत वितरण कंपनीने१९९७ मध्येच वीज जोडणी देण्यास बांधिल होती. पण वीज जोडणीसाठी लागणारे सामान वीज वितरण कंपनीकडे ऊपलब्ध नसल्यामुळे वीज जोडणीस विलंब झाला आहे असे आढळून येते. या विलंबास अर्जदाराची कोणतीही चूक नसल्याचे व ते जबाबदार नसल्याचे आढळून येते त्यामुळे देण्यात आलेले वाढीव रुपये ६१७०/- व सुधारीत रुपये २८५०/-चे कोटेशन ही चुकीची व अयोग्य आहेत असे मंचाचे मत आहे. वीजेचे दर वाढल्यामुळे व महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार ( सप्लायकोड कलम ११) वीज वितरण कंपनीने केलेली अनामत रकमेची वाढीव मागणी ही योग्य असल्याची आढळून येते.

वरील सर्व बाबींचे निरिक्षण केल्यानंतर मंच पुढील आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१) वीज वितरण कंपनीने अर्जदारास दिलेले दिनांक १८/१२/२००६ चे रुपये ६१६०/- चे वाढीव रकमेचे कोटेशन तसेच दिनांक २८/०८/२००७ रोजी दिलेले रुपये २८५०/- चे सुधारित कोटेशन रद्द करण्यात येत आहे.

२) विद्युत वितरण कंपनीने फक्त वाढीव सुरक्षा रक्कम रुपये १०००/-चे मागणीपत्र (कोटेशन) अर्जदारास ७ दिवसाच्या आत द्यावे व अर्जदाराने ते भरल्यानंतर, ३० दिवसाच्या आत,वीज वितरण कंपनीने अर्जदारास वीज जोडणी करुन द्यावी.

३) अर्जदाराने दिनांक १७/०७/१९९७ रोजी भरलेल्या रकमेवर भारतीय रिझर्व बँकेने निर्देशित केल्याप्रमाणे व्याज वीज जोडणीच्या तारखे पर्यंत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

**अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय जी. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/आर/५५/२००७/२४/**

**दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री भानुदास बापू मोरे, रा. मुर्शदाबादवाडी,**
**ता. फुलंब्री,जिल्हा - औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/५५/२००७/२४
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत मांडू शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**